चिंतन

# देशी गाय हीच खरी 'गोमाता'
## तिच्याशिवाय अपत्यांना अन्य नाही त्राता!



डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: 'पूर्वा कृषिदूत')

**आपल्या आईचा पान्हा बाळाला ठरतो जीवनदायी**

**हंडाभर निकस दूध कुचकामी कुंडाभर सकस ठरतं पुरेसं**

- देशी गोवंशाचा विदेशी संकर आरोग्यदृष्ट्या ठरतो भयंकर
- समाजपुरुषाचे डोळे 'पांढरे' करणारी 'धवल'क्रांती निरुपयोगी
- संकरित दुग्धोत्पादनाचे प्रमाण जितके मोठे; तितकेच तोटेही अधिक
- देशी गायींचे दूध प्रकृतीला हितावह; पंचगव्यही औषधी गुणधर्मांचे
- शासकीय तसेच संस्थात्मक स्तरावर देशी गोवंश संवर्धनाला चालना गरजेची
- काही गोपालक आवर्जून सांभाळत आहेत गीर गायींसह देशी गोवंश
- प्रसारमाध्यम म्हणून 'पूर्वा कृषिदूत'चाही संवर्धन- जागृतीत खारीचा वाटा

आम्ही सप्टेंबर २०१५ पासून देशी गायींच्या विदेशी होलस्टिन फ्रिजियन व जर्सी या जनावरांबरोबर (बॉस टॉरस) होणाऱ्या संकरीकरणाला विरोध सुरू केला. श्री स्वामी समर्थ संशोधन ट्रस्ट- दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्या पत्राने याची सुरवात झाली. या पत्रातील मजकूर अतिशय सखोल व शास्त्रशुद्ध होता. गायींच्या ६ प्रजाती, देशी व विदेशी गायींमधील फरक, दुधातील फरक इ. विषयांवर चांगली माहिती देण्यात आली होती. बॉस इंडिकस (देशी गायी) आणि बॉस टॉरस (विदेशी गायी) यांचं विभिन्न प्रजातींमधील संकरीकरण थांबवण्याचं आवाहन ('पूर्वा कृषिदूत' मासिकातून) आम्ही केलं होतं. त्यानंतर जर्सी व होलस्टिन फ्रिजियन जातींच्या दुधावरील जगभरात झालेल्या संशोधनाचा आम्ही आढावा घेतला. न्यूझीलंडमध्ये सर्वप्रथम या विषयावर संशोधन झाले. त्यांच्या सखोल अभ्यासातून सन १९९० मध्ये या विदेशी गायींच्या दुधामुळे पोटदुखीपासून कॅन्सरपर्यंत अनेक रोग निर्माण होतात, अशा आशयाचे संशोधन प्रसिद्ध झाले. त्या दुधामधील बीसीएम ७ हा घटक त्याला जबाबदार असल्याचे आढळून आले. देशी गायींचे दूध ए २ प्रकारचे आणि विदेशी गायींचे दूध ए १ प्रकारचे असल्याचे दिसून आले. या संशोधनाचा संक्षिप्त आढावा घेऊन आम्ही राज्यातील चार कृषी विद्यापीठं, एक पशुवैद्यकीय विद्यापीठ व त्या अंतर्गत असणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयांना पत्रं पाठवली आणि त्यावर त्यांचे अभिप्राय मागवले. (मात्र फक्त मुंबई व नागपूर येथील महाविद्यालयांकडून प्रतिसाद मिळाला.) यापैकी नागपूरचा अहवाल सविस्तर होता. सन २०१६ मध्ये आम्ही मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना या विषयावर एक पत्र लिहिले. त्यात हरितक्रांती व धवलक्रांतीचे दुष्परिणाम विशद केले. देशी गायींचे विदेशी गायींबरोबर होत असलेले

संकरीकरण बंद करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली. सोबत दोन महाविद्यालयांकडून आलेल्या पत्रांच्या प्रती जोडण्यात आल्या. त्या पत्राची नोंद घेण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्रीय कृषी व पर्यावरणमंत्री यांनी गोसंवर्धनावर राष्ट्रीय स्तरावर बैठक बोलावली होती.

## देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राला मंजुरी

महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या पुणे येथील कृषी महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागामध्ये देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. याचा फायदा राज्यातील देशी गोवंश पालन करणाऱ्या पशुपालकांना होणार आहे. शेतकऱ्यांचा देशी गायी संगोपनाकडे वाढता कल लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार व कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प सुरू होत आहे. येथे खिलार, देवणी, लालकंधारी, डांगी, गवळाऊ आणि कोकण कपिला या गायींचे संगोपन, संवर्धन, आहार, आरोग्य व्यवस्थापन, दुधातील वाढ, जातिवंत कालवडींची निर्मिती याबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे देशातील गीर, साहिवाल, लालसिंधी, थारपारकर आणि राठी या गायींचेही संवर्धन केले जाणार आहे. राज्यातील वातावरणात या गायींचे दूध उत्पादन, पैदास व प्रजननक्षमता याविषयी अभ्यास केला जाणार आहे. या केंद्रामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार केला जाईल. भ्रूण प्रत्यारोपण, लिंग निर्धारित रेतमात्रा तंत्रज्ञानातून कमी कालावधीत जास्त दूध देणाऱ्या गायींची संख्या वाढवण्यावर भर देण्यात येईल. चारा पिकांच्या सुधारित जातींची लागवड करून मूरघास निर्मिती करण्यात येईल. त्याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. आहाराबद्दल व रसायन अवशेषमुक्त दूध निर्मितीबद्दल मार्गदर्शन करण्यात येईल. गावठी गायींची आनुवंशिक सुधारणा करण्यास मदत केली जाईल. शेण व गोमूत्राच्या प्रक्रियांबद्दल मार्गदर्शन करण्यात येईल.

## महाराष्ट्रात 'साहिवाल क्लब'ची स्थापना

राज्यात साहिवाल जातींच्या गायी आणून 'साहिवाल क्लब'ची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांपासून जातिवंत दुधाळ साहिवाल गोवंशाचे संवर्धन शेतकरी करीत आहेत. पुण्याच्या प्रकल्पामुळे राज्यातील व देशातील दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गायींचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यास चालना मिळेल. तसेच त्यांची आनुवंशिक सुधारणा करता येईल, असे मत राज्याच्या साहिवाल क्लबचे अध्यक्ष श्री. संतोष राऊत यांनी व्यक्त केले.

## राज्यात अनेक ठिकाणी देशी गोवंश संवर्धन

विदेशी व संकरित गायी विविध रोगांना बळी पडतात. त्याकडे शेतकऱ्यांना लक्ष द्यावे लागते. त्यांच्या बैलांचाही शेतीसाठी चांगला उपयोग होत नाही. दूध जास्त मिळत असले तरी त्याला २५ रुपयांपेक्षा कमीच भाव मिळतो. देशी गायी कमी दूध देत असल्या तरी त्यांचे दूध औषधी गुणधर्माचे आहे. खेड्यांमध्ये त्याला ६० ते ८० रुपये व शहरांमध्ये १०० ते १२० रुपये भाव मिळतो. शेतकरी आता सावध झाले आहेत. खिलार, गीर, डांगी, देवणी, साहिवाल, कांकरेज, माळवी इ. जातींचे संवर्धन सुरू झाले आहे. साहिवाल व गीर या दोन जातींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## सन २०१८ चा 'गोपालरत्न' पुरस्कार मिळवणारे पाटील बंधू

तरसाळी हे नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातलं लहानसं गाव. तेथील अनिरुद्ध व शशिकांत या पाटील बंधूंची सटाणा- पिंपळनेर या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ७० एकर जमीन आहे. अनिरुद्ध पाटील सिव्हिल इंजिनीअर आहेत. एम.ई. पास झाल्यावर त्यांनी पुण्यातील एका नामांकित कंपनीत नोकरी केली. काही दिवस बांधकाम व्यवसायही केला. त्यांचे लहान बंधू शशिकांत हेही उच्चशिक्षित आहेत. सन २०१६ मध्ये चांगली नोकरी सोडून दोघे शेतीवर परतले. रासायनिक शेती सोडून सेंद्रिय शेतीचा त्यांनी ध्यास घेतला. गुजरातमधील वेगवेगळ्या ठिकाणांहून त्यांनी गीर गायी खरेदी करण्यास सुरुवात केली. गीर गायींचे साधारण चार प्रकार आढळतात. त्यांनी जवळपास १०० गायी आणल्या. त्यासाठी चांगला गोठा बांधला. मुक्तसंचार गोठ्याची सोय

केली. गायी उन्हात फिरल्यामुळे सूर्यकेतू नाडीवर चांगला परिणाम होऊन दूध व मूत्रामध्ये सुवर्णक्षार वाढायला मदत होते, असं त्यांचं म्हणणं आहे. सातशे लिटर दुधापासून १० ग्रॅम सोने मिळते, असा त्यांचा दावा आहे. त्यांच्या 'सारजा डेअरी व गीर गाय संवर्धन केंद्रा'ला केंद्र शासनाचा 'गोपालरत्न २०१८' हा पुरस्कार मिळाला. त्यावेळचे केंद्रीय कृषिमंत्री श्री. राधामोहन सिंग यांच्या हस्ते श्री. अनिरुद्ध पाटील यांनी हा या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पुरस्कार स्वीकारला. आता त्यांच्याकडे दूध देणाऱ्या २०० गीर गायी आहेत. त्यांचं दूध व तूप ते नाशिक व सटाणा शहरात विकतात. दुधाला ६० ते ८० रुपये व तुपाला २५०० रुपये किलोपर्यंत भाव मिळतो. ते वैदिक पद्धतीने तूप तयार करतात. त्यासाठी त्यांच्या मातोश्री सौ. शोभा पाटील मदत करतात. ताकालाही भरपूर मागणी असते. पंचगव्य, गोमूत्राचा अर्क इ. औषधी पदार्थांचीही ते निर्मिती करतात. शेतीमध्ये शेणखत व जिवामृताचा ते वापर करतात. शेणखताची विक्रीही होते. राज्यातील अनेक पुढारी या प्रकल्पाला भेट देत असतात. २६ नोव्हेंबरला राज्याचे कृषिमंत्री श्री. दादा भुसे यांनी या प्रकल्पाला भेट दिली. संध्याकाळी ४ नंतर ते आले. त्यावेळी गायीच्या धारा काढण्याचे काम सुरू होते. मंत्रिमहोदयांनी लगेच बादली घेऊन एका गायीचे पूर्ण दूध काढले. मोठा गोठा, २०० गायी व त्यांची गोंडस वासरे बघून त्यांनी पाटील बंधूंचे कौतुक केले. गायींची आनुवंशिक सुधारणा करण्यासाठी श्री. पाटील देशातील उत्कृष्ट वळूंच्या सिमेनचा वापर करतात. गायींच्या चाऱ्यासाठी जिंजवा, शेवगा, लसूणघास व इतर जातींचा वापर करतात. खाद्य ते स्वत:च तयार करतात. त्यात मका भरडा, सरकी पेंड, भाताचा कोंडा, बोव्हिनो, लाकडी घाण्यातील पेंड, यीस्ट, खाण्याचा सोडा व मिनरल मिश्रण यांचा समावेश असतो. गायींना दिवसभर सुमधूर बासरी वादनाचा आनंद मिळतो. गोठ्याची योग्य ती स्वच्छता राखली जाते. वासरांना मुक्तपणे दूध प्यायला दिले जाते. त्यानंतर उरलेले दूध काढण्यात येते.

### पठाण परिवाराकडून तीन पिढ्यांपासून देशी गायींचे संवर्धन

इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर हे श्री. माजिदखान पठाण यांचं गाव. हे गाव पुणे- सोलापूर मार्गावर पुण्यापासून १२० किलोमीटरवर आहे. माजिदखान साहेबांच्या घराण्यात तीन पिढ्यांपासून देशी गायींचे संवर्धन केले जात आहे. त्यांचे वडील रज्जाक पठाण अजूनही गायींची सेवा करतात. त्यांच्या मुलांनाही लहानपणापासून देशी गायींचा लळा लागलेला आहे. त्यांच्या फार्मचे नाव आहे 'रचना फार्म'. त्यांच्याकडे जवळपास ५० प्रकारच्या देशी गायी आहेत. यापैकी बऱ्याच जाती आता अस्तित्वात नाहीत. त्यांनी गीर आणि खिलार या दोन जातींकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. गायींसाठी मुक्तसंचार गोठा आहे. लहान-मोठ्या प्रत्येक गायीला त्यांनी 'नाव' ठेवलेलं आहे. नावाने हाक मारल्यानंतर ती गाय कळपातून त्या हाक मारणाऱ्या व्यक्तीजवळ धावत येते. हाक मारणारा तिला भाकरी किंवा पोळी देतो. गीर गायी १० ते २५ लिटर दूध देतात. रोज २८ लिटर दूध देणाऱ्या गायी त्यांच्याकडे आहेत. ते गीर गायींची अनुवंशीय सुधारणा करण्यात यशस्वी ठरत आहेत. भावनगर येथील एका सिद्ध वळूचे सिमेन आणून त्याचा प्रयोग त्यांच्या गायींवर केला आहे. त्यांच्याकडेही चांगले वळू आहेत. दुसऱ्या पिढीतील गायीला ते वेगळ्या वळूचा वापर करतात. म्हणजेच 'इनब्रीडिंग' टाळतात. ब्राझिलमध्ये सध्या दिवसाला ६५ लिटर दूध देणाऱ्या गीर गायी आहेत. आपल्यालाही ते शक्य असल्याचे माजिदखान सांगतात. खिलार गायीचे ९ प्रकार आहेत. त्यापैकी पंढरपुरी काजळी या जातीचं ते संगोपन करतात. त्यांच्याकडील खिलार वळू अतिशय उत्कृष्ट असून त्याला अनेक बक्षिसं मिळाली आहेत. शेतकऱ्यांकडे खिलार गायी जास्तीत जास्त २ लिटर दूध देतात. परंतु त्यांच्याकडे दिवसाला १० लिटर दूध देणाऱ्या गायी आहेत. खिलार जात शेतीसाठी प्रसिद्ध आहे. बैल चपळ व ताकददार असतात. खिलारमध्येही अनुवंशीय सुधारणा ते करीत आहेत. बंगानूर ही जात त्यांच्याकडे आहे. तिची उंची २.५ ते ३ फूट असते. तिला रोज फक्त ५ किलो चारा लागतो. दिवसाला ती ५ लिटर दूध देते. ही जात आता नामशेष होत आली आहे. सध्या त्यांच्याकडे ३८ खिलार गायी आहेत. गीर गायींची संख्या १०० च्या आसपास आहे. त्यांची संपूर्ण शेती सेंद्रिय पद्धतीची आहे. शेणगोमूत्राची रबडी ते वापरतात. फळबागांची काढणी झाल्यावर १ जुलैपासून १ नोव्हेंबरपर्यंत ते फळबागांमध्ये गायी मोकळ्या चरायला सोडतात. त्यामुळे मजुरांचा खर्च वाचतो. शेण जमा करावे लागत नाही. चाराही खाऊ

घालावा लागत नाही. शेण व मूत्र शेतात पडल्यामुळे फळांची चव व गोडी सुधारते, असे ते म्हणतात. देशी गायीचे दूध स्वास्थ्यासाठी अतिशय चांगले असते. या दुधापासून अनेक आजार बरे होतात. 'रचना फार्म'वर त्यांनी एक दवाखाना सुरू केला आहे. त्याची देखभाल एक चांगले प्रशिक्षित डॉक्टर करतात. वेगवेगळ्या आजारांवर ते देशी गायीच्या दुधाची शिफारस करतात. मधुमेह व कॅन्सरसारख्या आजाराच्या रुग्णांवर येथे यशस्वीपणे उपचार केले जातात. त्यामुळे या दवाखान्यात कायम गर्दी असते. सकाळपासूनच तेथे स्त्री-पुरुष रुग्णांची गर्दी दिसते. कत्तलखान्यात आलेल्या गायी कारखान्याचे मालक रचना फार्मकडे पाठवतात. जनावरं मरेपर्यंत त्या फार्मवर सांभाळली जातात. काहीही उपयोग नसला तरी त्यांची विक्री केली जात नाही. माजिदखान स्वत: इंजिनीअर आहेत. बांधकाम व्यवसायातही त्यांची प्रगती वाखाणण्याजोगी आहे.

## गणेश पांढरे यांनी घेतल्या सेंद्रिय शेतीसाठी गीर गायी

केळवद, ता. चिखली, जि. बुलढाणा येथील शेतकरी श्री. गणेश नामदेवराव पांढरे यांनी आपल्या २२ एकर जमिनीपैकी १२ एकरांमध्ये फळबाग लागवड केली आहे. त्यात मिडो आर्चर्ड पद्धतीने पेरुची लागवड केली आहे. विदर्भात आता शेतकरी डाळिंबाच्या बागा काढत आहेत. परंतु श्री. पांढरे मात्र डाळिंबाची लागवड वाढवत आहेत. रासायनिक निविष्ठांचा वापर कमी करून त्यांनी गोमूत्र व शेणाच्या स्लरीचा वापर वाढवला आहे. त्यासाठी त्यांनी १० गीर गायींचे संगोपन केले आहे. त्यांच्याकडे मुक्तसंचार गोठा आहे.

## जमीन भाडेतत्त्वावर घेऊन देशी गायींचे संगोपन करणारा प्रतीक भिडे

वाटेगाव, ता. वाळवा, जि. सांगली येथील प्रतीक भिडे हा तरुण. वेदविद्या शिकण्यासाठी तो काशी व केरळमध्ये गेला होता. सन २००५ मध्ये तो गावी परत आला. देशी गायीच्या दुधाचं महत्त्व त्याला समजलं होतं. त्यामुळे त्याने एक गीर गाय घेतली. सन २०१० पासून त्याने गायीची संख्या वाढवायला सुरवात केली. सन २०१५ मध्ये त्याने देवालयाची चार एकर जमीन भाडेतत्त्वावर घेतली. त्याला घरची जमीन नाही. कर्ज घेऊन त्याने या जमिनीवर गोठा उभा केला. जवळपास ३५ गायी त्याच्याकडे होत्या. आतापर्यंत तो चारा विकत घेत होता. या जमिनीत त्याने यशवंत गवत व ज्वारीची लागवड केली. पाण्यासाठी एक टाकी ठेवली व चाऱ्याचे तुकडे करण्यासाठी एक मशिन घेतले. जागेअभावी त्याने काही गायी विकल्या. त्याच्याकडे १६ गीर व ३ कांकरेज गायी होत्या. खेड्यात दुधाला मागणी नव्हती. शहरात मागणी होती पण ते परवडणारे नव्हते. त्यामुळे पहिल्यापासूनच त्याने तूप करायला सुरवात केली. ३५ लिटर दुधापासून १ किलो तूप तयार होते. तुपाला चांगली मागणी आहे. त्याला २५०० रुपये किलो भाव मिळतो. गोमूत्र व शेण्या यांनाही मागणी आहे. स्वत:ची शेती नसतानाही देशी गायीचे संगोपन करणारा हा तरुण कौतुकास पात्र आहे. पिकांवर फवारणी करण्यासाठी ताकाला भरपूर मागणी आहे. त्याला २० रु. लिटरचा भाव मिळतो.

## नितीन काकडे यांची संकरित गायींकडून देशी गायींकडे वाटचाल

श्री. मनोहर काकडे हे बोधेगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर येथील शेतकरी. त्यांच्याकडे ४० एकर शेती आहे. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांच्याकडे संकरित गायी होत्या. हा व्यवसाय त्यांनी आपला मुलगा नितीन याच्याकडे सोपवला. नितीनने संकरित गायी कमी करून म्हशी घेतल्या. म्हशीच्या दुधाला भाव चांगला होता आणि मागणीही चांगली होती. दरम्यान त्यांच्या आईला गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला. पुणे येथील डॉक्टरांनी पौष्टिक दूध घेण्याचा सल्ला दिला. त्यासाठी गावातील लोकांनी त्यांना गीर गाय पाळण्याची सूचना केली. गीर गायीचे दूध नियमित घेतल्यामुळे आईच्या प्रकृतीत फरक दिसू लागला. त्यामुळे त्यांनी देशी गायींचा सांभाळ करण्याचा निर्णय घेतला. पाच वर्षांपासून गीर, कांकरेज, साहिवाल, थारपारकर आदी विविध जातींच्या १०५ गायींचे ते संगोपन करीत आहेत. नितीन हे एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी जिल्हा परिषद सदस्य व सरपंच या पदांवर काम केले. सध्या ते उपसरपंच आहेत. असे असले तरी ते शेतीलाच महत्त्व देतात. ते कुस्तीपटूही आहेत. सन १९८५ ते २००४ या काळात ते कुस्तीत सक्रिय होते. त्यांच्या शेतातच कुस्तीचा आखाडा आहे. त्यांचा मुलगा संग्राम आता कुस्तीचे धडे वडिलांकडून गिरवीत आहे. कुस्ती करणाऱ्या पहिलवानांना सुद्धा गायीचे दूध फायद्याचे

असल्याचे नितीन सांगतात. गेल्या १० वर्षांपासून रासायनिक शेती बंद करून सेंद्रिय शेती करतात. रोज सकाळी गोमूत्र जमा करतात. शेतीत गोमूत्र व शेणाचा ते वापर करतात. अतिरिक्त गोमूत्राची ते विक्री करतात. गुरांसाठी लसूणघास, मका, बीट, गाजर व कोरडा चारा यांचा वापर करतात. प्रत्येक गायीला १ किलो बीट व १ किलो गाजर खाऊ घालतात. त्यामुळे दुधाची प्रत खूप सुधारते. ओला ३०% व वाळलेला ७०% या प्रमाणात ते चारा देतात. आरोग्याला उपकारक असल्यामुळे देशी गायीच्या दुधाला मोठी मागणी आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी ते मूरघास तयार करतात. ४० लिटर दूध ८० रुपये भावाने परिसरातील ग्राहकांना विकतात. उरलेल्या दुधापासून तूप बनवतात. गीर गायीच्या तुपाला जास्त मागणी आहे. नगर, औरंगाबाद व पुणे येथे २००० रुपये किलोप्रमाणे तुपाची विक्री होते. त्यांच्याकडे मुक्तसंचार पद्धतीचा गोठा आहे.

### देवणी गोवंशाच्या संवर्धनासाठी बारामतीचा प्रतिसाद

मराठवाड्यातील 'देवणी' ही देशी गायीची जात दुधासाठी व शेतीसाठीही प्रसिद्ध आहे. परंतु या जनावरांची संख्या कमी होत आहे. देवणी गोवंशाचे जतन होण्यासाठी बारामती येथील ॲग्रिकल्चरल ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर जिनेटिक इम्प्रुव्हमेंट ऑफ डेअरी ॲनिमल्स' या संस्थांकडून मदतीचा हात मिळणार असल्याचे आमदार धीरज देशमुख यांनी म्हटले आहे. संस्थेचे विश्वस्त श्री. रणजित पवार यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणापासून दुधाळ गायी- म्हशींच्या वंशावळीच्या संगोपनापर्यंतची विविध स्तरावरील कामे एकाच छताखाली तेथे चालतात. देवणी गोवंशाचे जतन करण्याबरोबरच शेतकरी प्रशिक्षण, संशोधन, अभ्यास, खाद्य व्यवस्थापन, रोगनिदान अशा विविध स्तरांवर सहकार्य केले जाईल, असा शब्द रणजित पवार यांनी आमदार श्री. देशमुख यांना दिला.

### दिवसाला १०० लिटर दूध देणारी पुंगनूर गाय

आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यात पुंगनूर हे गाव आहे. या गावावरून या गायीचे नाव पुंगनूर पडले. 'पुंगनूर ड्वार्फ' ही आंध्र प्रदेशातील एक देशी गाय आहे. या गायीची उंची ७० ते ९० सें.मी. असते. तिचे वजन ११५ ते २०० किलो असते. दिवसभरात ५ किलो चारा खाऊन ती ५ ते ५० लिटर दूध देते. गायीच्या दुधात ३ ते ३.५% फॅट असते. या गायीच्या दुधात ८% फॅट असते. म्हणजेच म्हशीच्या दुधासारखी. ती उष्ण हवामानात व दुष्काळी परिस्थितीतही चांगला तग धरते. या दुधात औषधी गुणधर्म आहेत. तिरुमला तिरुपती मंदिराकडे या वंशाच्या २०० गायी आहेत. त्यापैकी एक गाय रोज १०० लिटर दूध देते. या गायीच्या दुधानेच भगवान तिरुपतींना अभिषेक केला जातो. या गायीचं दर्शन घेणं अतिशय शुभ मानण्यात येतं. तिची किंमत १२ कोटी रुपये आहे. ही गाय घरी असणं हे ऐश्वर्याचं लक्षण मानलं जातं. श्रीमंत लोकांमध्ये या प्रकारच्या गायी बाळगण्याची स्पर्धा लागलेली असते. या गाईचा गीर, साहिवाल, कांकरेज, थारपारकर, खिलार, माळवी, राठी, हरयाणा, देवणी अशा विविध जातींबरोबर संकर करायला हरकत नाही.

### पाच गीर गायींपासून वार्षिक ७ लाख २० हजार रुपये नफा

वाशिम जिल्ह्यात फाळेगाव या गावात संतोष कोरडे नावाचे एक शेतकरी आहेत. त्यांच्याकडे कोरडवाहू जमीन आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. गीर गायीचा मोठा गोठा असलेल्या त्यांच्या मित्राने त्यांना एक गीर गाय घ्यायची सूचना केली. सन २०१५ मध्ये त्यांनी गाय खरेदी केली. तिचे दूध ६५ रुपये लिटरप्रमाणे विकले. उरलेल्या दुधापासून तूपही करीत गेले. तुपाला २५०० रुपये भाव मिळाला. सध्या त्यांच्याकडे ५ गायी आहेत. दूध व तुपाखेरीज ताक, गोमूत्र व गोवऱ्या त्यांनी विकल्या. त्यांच्या मित्रामुळे त्यांच्या तुपाला अनेक शहरांमधून मागणी येते. खाद्य, मिनरल, चारा व मजुरीचा खर्च वजा करून त्यांना वार्षिक ७ लाख २० हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळतो.

### इंजिनीअर अभय व सौ. सुप्रिया खानापुरे यांचा 'गोशक्ती ब्रॅण्ड'

श्री. अभय खानापुरे यांचा पुण्यामध्ये टू व्हीलरसाठी गिअर्स, केमशॉफ्ट इ. भाग बनवण्याचा कारखाना आहे. गेल्या २८ वर्षांपासून ते हा व्यवसाय करतात. गोपालनाबद्दल या दाम्पत्याला आवड निर्माण झाली. सन २०१०

मध्ये त्यांनी एक खिलार गाय विकत घेतली. त्यांना दुधाळ गाई घेण्याची इच्छा झाली. ते गुजरातमध्ये गेले. गीरचे जंगल व जुनागड परिसर त्यांनी धुंडाळला. शेतकऱ्यांच्या मदतीने ७ गाई खरेदी केल्या. १०-१२ दिवस मुक्काम केला. पुढे ६-७ वेळा भेट दिली. प्रत्येक वेळी ६-७ गायी आणल्या. एका संस्थानिकाकडे २००० गीर गायी आहेत, त्यांचं मार्गदर्शन घेतलं. गुजरातमध्ये स्वामी नारायणाची अनेक मंदिरं आहेत. त्यांच्याकडे जातिवंत गीर गायी असतात. त्यापैकीच एका मंदिराकडून त्यांनी एक ३३ महिने वयाचा सिद्ध वळू घेतला. त्याची संपूर्ण माहिती तपासली. आता ४०% गायी त्यांच्या फार्मवर निर्माण झालेल्या आहेत. मार्केटिंगसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. सकाळच्या वेळी फिरणाऱ्यांची गर्दी असणाऱ्या भागात ते स्टॉल लावत. गीर गायीच्या सेंद्रिय दुधाची माहिती देत. पत्रके वाटत. बऱ्याच भागात त्यांनी प्रचार केला. पुणे- सातारा रस्त्यावरील ३० कि.मी. अंतरावरील करंदी गावात त्यांनी २५ एकर डोंगराळ जमीन खरेदी केली. रस्त्याच्या एका बाजूला ६ एकरांत गायींचा फार्म उभारला. त्यांचा मुलगा सोहम इंग्लंडमधून ऑटोमोबाईल इंजिनीअर होऊन परतला. त्याने मार्केटिंगमध्ये पुढाकार घेतला. पाऊचचं डिझाईन तयार केलं. सध्या त्यांचे २२० ग्राहक आहेत. रोज २०० ते २५० लिटर दूध मिळते. गायी ८ लिटर दूध देतात. काही १४ लिटर देणाऱ्या गायीही आहेत. एक डेअरी मॅनेजर असून ५ डिलिव्हरी करणारी मुले आहेत. दुधाचा भाव ८० रुपये आहे. महिन्यात १५-२० किलो तूप तयार होते. त्याला ३२०० रुपये भाव मिळतो. दूध काढण्यासाठी व गायींची देखभाल करण्यासाठी ४ गवळी आहेत. शेतात काम करण्यासाठी २ गडी आहेत. फार्ममध्ये शेण-गोमूत्राचा २ फूट उंचीचा थर झाला आहे. त्यावर बसायला गायींना आवडते असे अभय सांगतात. 'ए.के. ऑरगॅनिक फार्म' असं त्यांच्या गोठ्यांचं नाव आहे. सध्या त्यांच्याकडे १३२ गायी आहेत.

## दुधाच्या 'महापुरा'कडून देशी दुग्धगंगेच्या तीरावर!

मुंबईच्या दुधाची गरज गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील दूध उत्पादक भागवत होते. या व्यवहारातील सर्व नफा 'पोल्सन' या खासगी कंपनीच्या घशात जात होता. त्यामुळे पेस्तनजी एडुलजी हा पारशी व्यापारी गब्बर झाला होता. सरदार पटेल व मोरारजी देसाई यांच्या प्रेरणेने त्रिभुवनदास पटेल यांनी १९४६ साली आणंद येथे देशातील पहिली सहकारी दुग्ध उत्पादन संस्था सुरू केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. वर्गिस कुरियन आणंदला आले. सहकारी चळवळीचे नेतृत्व पटेल यांनी व प्रशासकीय व्यवस्थापन डॉ. कुरियन यांनी सांभाळले. त्यांनी 'आणंद मिल्क युनियन लिमिटेड' अर्थात 'अमूल' हा ब्रॅण्ड विकसित केला. काही वर्षांतच अमूल देशभर पोहोचला. केंद्रीय पातळीवर नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड (एन.डी.डी.बी.) या संस्थेची स्थापना झाली. त्याची धुरा डॉ. कुरियन यांच्यावर सोपवण्यात आली. देशाला दूध उत्पादनात अग्रेसर बनवण्यासाठी सन १९७० मध्ये 'ऑपरेशन फ्लड' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आली. त्याची जबाबदारीही डॉ. कुरियन यांच्याकडे आली. त्यांनी संकरित जाती विकसित करण्यास महत्त्व दिले. १९७० ते १९९६ दरम्यान राबवण्यात आलेल्या 'ऑपरेशन फ्लड'ला अभूतपूर्व यश लाभले. त्यामुळे भारत हा जगातील दुग्ध उत्पादनातील प्रथम क्रमांकाचा देश बनला. डॉ. कुरियन यांना पद्मविभूषण, मॅगसेसे, वर्ल्ड फूड प्राईज इ. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले. परंतु या मोहिमेमुळे देशातील ५० पेक्षा अधिक देशी गायींच्या जाती नामशेष झाल्या. (त्यामुळे केरळमधील एका कॅप्टनने डॉ. कुरियन यांना 'देशद्रोही' म्हणून संबोधले होते.)

विदेशी वळूंचे सिमेन शेतकऱ्यांना पुरवू नये म्हणून उरळीकांचन येथील 'बायफ'चे अध्यक्ष व सांगली जिल्ह्यातील भिलवडी येथील चितळे डेअरीच्या मॅनेजरना पत्र लिहून आम्ही कळवले होते. त्याचप्रमाणे बारामती येथे अमेरिकेतून होलस्टिन फ्रिजियन जातीचे स्त्री भ्रूण आणून १६ गायींमध्ये ते प्रत्यारोपित करण्यात आले होते. त्यांनाही त्या जन्म घेणाऱ्या कालवडी अमेरिकेला परत पाठवण्याचा सल्ला दिला होता.

आता जनतेला विदेशी व संकरित गायीचे व त्यांच्या दुधाचे दोष समजले आहेत. देशी गायींचे व त्यांच्या दूध, शेण व मूत्राचे फायदेही समजले आहेत. देशी गोमातेच्या संगोपनात मोठी क्रांती घडून येत आहे. असंख्य यशोगाथांपैकी थोड्याशाच यशोगाथा या लेखात उदाहरणादाखल दिल्या आहेत. आपल्या भारतात विदेशी व संकरित गायींचे अस्तित्व लवकरात लवकर नगण्य व्हावे असे वाटते. ■